ISSN : 2393-8900

# Historicity

## International Research Journal

**Volume 2 | Issue 8 | April 2016**
**Impact Factor : 0.4521 (UIF)**



**Editor-In-Chief**
Dr. Sanjay Gaikwad

HISTORICITY RESEARCH JOURNAL

ISSN NO:- 2393-8900
Vol- 2| Issue 8|April -2016

Contents

17
सिनामाई कृषी विज्ञान मंडळ शेतकऱ्यांसाठी दीपस्तंभ
राजेंद्र गायकवाड

24
शिवाजी महाराजांचे विरोधकांना आपल्याकडे आकर्षित करण्याचे तंत्र
रविंन्द्र मुन्द्रे

पार्वतीबाई शंकर रावडिगे यांचे दलित चळवळीतील कार्य

1 पार्वतीबाई शंकर रावडिगे यांचे दलित चळवळीतील कार्य
Dr. Sarvade Sanghmitra Vithalrao

5 पेशवेकालीन अहमदनगरमधील न्यायदान पद्धती
संतोष यादव

10 शिवाजी महाराजांचे उदार धार्मिक धोरण
रविंन्द्र मुन्द्रे

15 ब्रिटीश कालीन बुलढाणा विभागातील सत्यशोधक विवाहाचा इतिहास
प्रमोद रामेश्वर चव्हाण

IN THIS ISSUE

श्री आनंदऋषिजी महाराजांचे सामाजिक कार्य
हरिदास शंकर जाधव 29

The Future Libraries And Visionary Roles For Reservation Of Manuscripts
Jayashri Kulkarni 33

गंगा के जल प्रदूषण का प्रभाव एवं सरकार कि नीति
रेनु चौहान 41

Historicity Research Journal
Volume 2 | Issue 8 | April 2016

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

# पार्वतीबाई शंकर रावडिगे यांचे दलित चळवळीतील कार्य

**Dr. Sarvade Sanghmitra Vithalrao**
**Dept. Of History, Hon. Shri Annasaheb Dange**
**Arts, Commerce & Science College, Hatkanangale.**

**प्रस्तावना :-**

भारताच्या इतिहासात नवसमाज निर्मीतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान फार मोठे आहे. भारतीय समाज व्यवस्थेतील स्त्री व शूद्र या दोन्ही गुलामाच्या अफाट जनसमुदायाला बाबासाहेबांनी गुलामगिरीतून मुक्त केले. समाजात स्त्रीयां विविध गटामध्ये विभागल्या गेल्या आहेत या सर्व स्तरातील स्त्रीयांना भोगाव्या लागणा-या व्यथांची कारणमिमांसा त्यांनी केली. भारतीय संविधान व हिंदू कोड बिलाद्वारा भारतीय स्त्रीला जीवनाच्या सर्व क्षेत्रात पुरूषाबरोबरचा समान अधिकार दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवमुक्तीच्या लढ्यात दलित स्त्रीसुद्धा पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून समर्पणाच्या भावनेने अनेक आघाड्यांवरून लढलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रियांना दिलेल्या संदेशांचे पालन तिने केले आहे. सभा-संमेलनांतून ती बोलू लागली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेल्या परिषदांमध्ये त्यांनी स्त्रियांसाठी वेगळ्या परिषदा घेतल्या. या परिषदांना मोठ्या संख्येने स्त्रिया मोठ्या संख्येने उपस्थित राहू लागल्या होत्या. डॉ. बाबासाहेबांच्या निर्वाणा नंतर झालेल्या विविध चळवळीत ही स्त्रियांनी मोठ्या संखेने भाग घेतला.[१]

डॉ.आंबेडकर आपल्या पत्नी रमाबाईंना लिहीलेल्या एका पत्रात म्हणतात, 'प्रिय रामू, मी स्त्री मुक्तीसाठी लढणारा एक लढवय्या शिपाई आहे. स्त्रियांच्या उन्नतीसाठी मला जे जे करता येईल ते ते मी आवश्य करीन. प्रसंगी विरोध पत्करावा लागला तरी मी माघार घेणार नाही.'[2] स्त्रीयांच्या उन्नतीचा ध्यास घेणारे बाबासाहेब आज स्त्री मुक्ती संदर्भात होणा-या आंदोलनाचे प्रणेते होत. आंबेडकरी चळवळीत कार्य करणा-या स्त्रियांचे वैशिष्ट्य म्हणजे या स्त्रियां समाजाच्या प्रश्नासाठी जेवढ्या ताकदीने लढतात तेवढ्याच ताकदीने स्त्रियांच्या प्रश्ना संबंधी लढतात.

उद्देश :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित होवू काम करणा-या पार्वती शंकरराव दिगे यांचे दलित चळवळीतील कार्याची नोंद घेणे.

जीवन चरित्र :

रा. १२९८, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर येथील पार्वतीबाई डिगे सध्या हयात नाहीत. त्यांचा जन्म बेनाडी ता. चिकोडी येथे झाला. त्यांचे वडील पिराजी वराळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी होते. त्यांच्या माहेरची परिस्थिती चांगली होती. वडील पिराजी यांची तंबाखूची वखार होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निपाणीच्या सभेसाठी त्यांनी मोठी आर्थिक मदत केली होती. त्यांचा विवाह शंकरराव खंडेराव डिगे यांच्याशी झाला. शंकररावांच्या आई चंद्रभागाबाई यांनी

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

अतिशय कष्टाने मुलांना शिकवले. त्या लक्ष्मीपुरीमध्ये धान्याच्या दुकानात कामाला होत्या. शंकररावांनी शिक्षण पूर्ण करून नागोजीराव पाटणकर हायस्कूल व ताराराणी विद्यापीठात शिक्षक म्हणून काम केले. पुढे करवीरचे तहसीलदार म्हणूनदेखील काम केले. त्यांचे शिक्षण बी.ए.,बी.टी.पर्यंत झाले होते. तर पार्वतीबाईंचे शिक्षण ७ वी इयत्तेपर्यंत झाले होते. इ.स.१९५७ मध्ये शंकरराव 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन'तर्फे लोकसभेच्या निवडणुकीला उभे राहिले, तेव्हा ते तीन लाख मतांनी लोकसभा सदस्य म्हणून निवडून आले. मात्र पार्वतीबाईंनी पती खासदार झाल्यावरदेखील त्यांच्या राहणीमानात बदल केला नाही, त्यांचे राहणीमान अगदी साधे राहिले. तसेच, त्यांच्या आईने धान्याच्या वखारीतील काम सोडले नाही.

सावित्रीबाई फुले महिला मंडळाची स्थापना :

शंकरराव डिगे यांनी सिद्धार्थ तरुण मंडळाची स्थापना केली होती.त्यांच्या या कार्यात त्यांच्या पत्नी पार्वतीबाई यांचा सक्रिय सहभाग होता. महिलांमध्ये प्रबोधन व्हावे म्हणून त्यांनी महिलांना एकत्र करूनइ.स. १९७० च्या दरम्यान सावित्रीबाई फुले महिला मंडळाची स्थापना केली. या मंडळाचे एक भजनी मंडळ होते. त्यातून पार्वतीबाईंनी खेडोपाडी जाऊन बाबासाहेबांचे चरित्र लोकांसमोर मांडले. या भजनी मंडळातून त्यांनी प्रबोधनाचे कार्य केले. या सावित्रीबाई फुले महिला मंडळामार्फत महिलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी पार्वतीबाईंनी त्यांनी शिवणकामाचे धडे दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी'डॉ. बाबासाहेब आंबेडकर गीतमाला' या गायनपार्टीतून खेड्यापाड्यांत जाऊन जनमानसांशी संपर्क ठेवून बाबासाहेबांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे कार्य पार्वतीबाईंनी केले.

**बालवाडी:**

मुलांवर चांगले संस्कार व्हावेत व त्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्यांनी बालवाडी चालवली. यासाठी समाजातील शिक्षित महिलांचा सहभाग घेऊन हे कार्य केले.

**महिला अधिवेशन :**

त्यांनी महिलांचे भव्य अधिवेशन कोल्हापूरात आयोजित केले होते. या माध्यमाधून त्यांनी महिलांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्याचे प्रयत्न केले. या अधिवेशनाची प्रेरणा त्यांनी शांताबाई दाणी यांच्याकडून घेतली. शांताबाई दाणी यांच्याप्रमाणेच आपणदेखील महिलांचे प्रश्न सोडवावेत असे त्यांना वाटल्यामुळे त्यांनी हे अधिवेशन आयोजित केले. हे अधिवेशन त्यांनी करवीर भगिनी मंडळ, कोल्हापूर येथे भरवले. या अधिवेशनास महिलांचा चांगला प्रतिसाद लाभला होता.

लक्ष्मीपुरी, कोल्हापूर येथील दलाल मार्केटला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे म्हणून चळवळ उभी केली होती. या चळवळीचे नेतृत्व पार्वतीबाईंनी केले होते.

**विद्यार्थी व कार्यकर्ते घडवण्याचे कार्य :**

राजर्षी शाहू राजांनी महार समाजातील मुलांसाठी 'मिस क्लार्क वसतिगृह' सुरू केले होते. या वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या संगोपनाची जबाबदारी त्यांनी घेतली होती. बऱ्याच वेळेला ही मुले त्यांच्या घरी जेवायला असत. या मुलांना आईच्या मायेने त्या जेवू घालत. या वसतिगृहातील मुले त्यांना 'माई' म्हणत. त्या जेवणासोबतच या मुलांना प्रसंगानुरूप कपडेलत्ते व औषधपाणीदेखील करत असत.

या मुलांप्रमाणेच त्या चळवळीतील कार्यकर्त्यांना मदत करत. कार्यकर्ते कामानिमित्त खेड्यापाड्यांतून कोल्हापुरात येत असत. दिवसभराचे काम उरकून परत जाण्यासाठी गाडी नसली की, ते रात्री वसतीसाठी त्यांच्या घरी असत. तेव्हा त्यांना कार्यकर्त्यांच्या जेवणाची व प्रसंगी गाडीखर्चाचीही सोय बऱ्याच वेळा करावी लागे. असे करताना कार्यकर्ता कोणत्या गटाचा आहे,हे त्यांनी कधी पाहिले नाही. अशा पद्धतीने त्यांनी कार्यकर्ते घडवण्याचे कामदेखील केले.

 Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

**विविध चळवळी व आंदोलनांतील सहभाग :**

१. कर्मवीरदादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या भूमिहीनांच्या सत्याग्रहात त्यांनी सहभाग घेतला होता. यासंदर्भातील झालेल्या जेलभरो आंदोलनात त्या सहभागी झाल्या होत्या.

२. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या लढ्यात त्या सामील झाल्या होत्या.या चळवळीमध्ये त्यांना तुरुंगवासाची शिक्षा झाली होती.

३. सन १९७२ साली डॉ. बाबासाहेबआंबेडकरांचे सुपुत्र भैय्यासाहेब आंबेडकरांची कोल्हापुरात बिंदू चौकात सभा झाली होती. ही सभा यशस्वी करण्यासाठी त्यांनी मोठे परिश्रम घेतले.[3]

**बौध्द धम्माची दिक्षा :**

पार्वतीबाई व शंकरराव डिगे हे दोघेपण इ.स. १९५६ साली नागपूर येथे झालेल्या धम्मदीक्षा सोहळ्यास उपस्थित होते. दोघांनीही या कार्यक्रमात बौद्ध धम्माची दीक्षा घेतली.[4] बौद्ध धर्माच्या पद्धतीनुसारच सर्व संस्कार झाले पाहिजेत यासाठी त्या आग्रही असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माची जाहीर धम्मदीक्षा घेण्यापूर्वीच इ.स. १९५४ मध्ये त्यांनी बौद्ध धम्म पद्धतीनुसार विवाह घडवून आणला. आक्काताई व मधुकर चंद्राप्पा कांबळे या दोघांचा विवाह कोल्हापूर जिल्ह्यातील शहाजी वसाहत, रुकडी येथे बौद्धपद्धतीने या उभयतांनी लावून दिला. मधुकर कांबळे हे शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाचे कार्यकर्ते होते. [5]

**हक्क व कर्तव्याची जाण :**

चळवळीत काम करत असताना त्यांना आपल्या हक्क व कर्तव्याची जाण होती. इ.स. १९७९ त्यांचे लक्ष्मीपुरी येथील घर 'दि कोल्हापूर मोटर ट्रान्सपोर्ट प्रोड्युसर ॲण्ड कन्झ्युमर सोसायटी' या कंपनीने बळकावले होते. आपले घर परत मिळवण्यासाठी आमरण उपोषणास बसल्या. त्यांच्या महिला कार्यकर्त्यांनी त्यांना याकामी साथ दिली. हे उपोषण सात दिवस चालले होते. त्या वेळी एन.डी. पाटील हे सहकारमंत्री होते. एका क्रांतिकारी विधवेचे घर बळकावणे योग्य नव्हे, ते त्यांना मिळवून द्यावे, अशी सहानुभूती त्यांनी दाखवली होती. अशा पद्धतीने संघर्ष करून त्यांनी घराचा ताबा मिळवला. याच घरात त्यांनी रिपब्लिकन पक्षाचे पहिले कार्यालय सुरू केले होते. तसेच, कोहापूर येथील म्युनिसिपल स्कूल बोर्डवर मा.ई. कुरणे यांना निवडून आणण्यासाठी त्यांनी परिश्रम घेतले.

चळवळीत कार्य करताना त्यांच्या घरात सामाजिक समतेचा विचार रुजला व घरामध्ये शैक्षणिक प्रगती झाली. तसेच, जुन्या चालीरीती व अंधश्रद्धा सोडून देऊन विज्ञानवादाची कास धरली. सासर व माहेरचा चळवळीचा वारसा चालवत असताना त्यांना खूप त्रास झाला. कामासाठी बाहेर पडल्यावर मुलांच्या जेवणाचा प्रश्न निर्माण होई तेव्हा मुलांना त्या केळी, चुरमुरे, फुटाणे देऊन प्रश्न मिटवत.[6]

त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र वाचले होते. तसेच, 'बुद्धा ॲण्ड हीज धम्मा'चेदेखील वाचन केले होते. चळवळीत काम करताना स्त्रियांच्या व समाजाच्या दोन्ही प्रश्नाला महत्त्व दिले. त्यांनाराजकारणातल्या नेत्यांच्या कार्याची माहिती होती.शांताबाई दाणी यांच्या कार्याचा त्यांच्यावर खोलवर परिणाम झाला होता. यशवंतराव चव्हाणांच्या पत्नी वेणूताई यांच्याशी पार्वतीबाईंची मैत्री होती. त्यांच्या सूनबाई कांचन सदानंद डिगे सध्या चळवळीत सक्रिय आहेत. त्या महिलांना एकत्र जमवून वेगवेगळ्या उपक्रमांसाठी प्रोत्साहित करतात.

कोल्हापुरातील आंबेडकरी चळवळीतील अशा धडाडीच्या कार्यकर्तीचे निधन वयाच्या ६५ व्या वर्षी दि. १७ डिसेंबर १९९१ रोजी झाले.

**निष्कर्ष :**

पार्वती बाई यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची ओळख त्याच्या माहेच्या घरातूनच झाली होती.त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरीत होऊन समाजासाठी कार्य केले. स्त्रियांचे संघटन करून सावित्रीबाई फुले

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

महिलामंडळाची स्थापणा केली या मंडळामार्फत महिलांनसाठी विविध कार्यक्रम घेतले महिला परिषद घेऊन स्त्रियांच्या प्रश्नावर प्रकाश टाकला. तसेच समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी विविध पातळ्यावर लढा दिला.

भारतीय स्त्रियांचा अभ्यास म्हणजे त्यांचे जीवन ज्या धर्म, रूढी व परंपरा यांनी बंदीस्त झाले आहे त्या सर्व गोष्टींचा अभ्यास आपण करतो पण आंबेडकरी विचाराणे प्रेरीत झालेल्या स्त्रियांचा अभ्यास म्हणजे त्यांनी चाकोरी बाहेर पडून आधुनीकतेची कास धरून रूढी परंपरा नाकरत समतेसाठी, हक्कासाठी व स्वत: च्या अस्तीत्वा साठी लढा दिला.असे म्हणावे लागते.

संदर्भ :

१) सरवदे एस. व्ही.आंबेडकरी चळवळीत स्त्रीयांचा सहभाग –विशेष संदर्भ : कोल्हापूर, सांगली व सातारा (इ.स. 1920 ते 2000) पीएच. डी शोध प्रबंध 2012 ( टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे)

२) संपादक, मुन मीनाक्षी, फुले आंबेडकरी स्त्रचळवळ(लांजेवारज्योती,डॉ.बाबासाहेबआंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार)समता प्रकाशन नागपूर पाचवी आवृत्ती 2014 पृ 37

३) दै समाज कोल्हापूर 28 डिसेंबर 1991

४) दै तरूण भारत कोल्हापूर अवृत्ती 18 डिसेंबर 1991

५) डिगे राजाभाऊ (पार्वतीबाई डिगे यांचा मुलगा) यांची मुलाखत दि 31-10-2010

६) डिगे सदानंद (पार्वतीबाई डिगे यांचा मुलगा) यांची मुलाखत दि. 31- 10- 2010